*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-III, February 2012*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबादचा मुक्ती संग्राम

**अनिल आर. बनकर :** साहाय्यक प्राध्यापक-नि-साहाय्यक संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रस्तावना :-**

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात एकूण ६९९ स्वतंत्र संस्थाने कार्यरत होती. त्यामध्ये काही संस्थाने आकाराने लहान तर काही आकाराने मोठी होती. हैद्राबाद संस्थान हे भौगोलिक दृष्ट्या एक विस्तीर्ण संस्थान होते. या संस्थानामध्ये १९४१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १ कोटी, ६३ लाख, ३८ हजार, ५३४ होती. हैद्राबाद संस्थानामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्याच्या काही भागांचा समावेश होता. महाराष्ट्रातील मराठवाडा, आंध्रमधील तेलंगणा तर कर्नाटकातील बिदर या भागाचा समावेश होता.

संस्थानामध्ये जातीनिहाय लोकसंख्या खालीलप्रमाणे होती.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मुस्लिम | - | २०,९७,४७५ |
| ०२. | ब्राम्हण | - | ३,६३,२९६ |
| ०३. | ब्राम्हणेतर | - | ९१,७१,३१८ |
| ०४. | लिंगायत | - | ८,०६,०९५ |
| ०५. | आर्यसमाज | - | ४०,९०० |
| ०६. | जैन | - | २४,८५३ |
| ०७. | अनु. जाती | - | २९,२८,०४० |
| ०८. | अनु. जमाती | - | ६,७८,१४९ |
| ०९. | ख्रिस्ती | - | २,२०,४६४ |
| १०. | शीख | - | ५,३३० |
| ११. | फारशी | - | १,९७४ |
| १२. | इतर | - | ६४० |

१ जनगणना अहवाल, १९४१

संस्थांमधील जातीनिहाय लोकसंख्येचा विचार केला असता असे लक्षात येते की, संस्थानामध्ये मुस्लिमांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या केवळ १०टक्के होती. तर उर्वरीत लोकसंख्या ही हिंदूंची होती; म्हणजे हैद्राबाद संस्थानामध्ये बहुसंख्य प्रजा ही हिंदू होती. संस्थानाचा संस्थानिक हा मुस्लिम होता. त्याची राजवट ही धर्मांध, जुलमी व इस्लामी स्वरुपाची होती. हैद्राबाद संस्थानाच्या प्रमुखाला "निजाम" असे संबोधले जात असे, त्यापैकी सातवा निजाम मीर उस्मानअली खान याला हैद्राबादमध्ये स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र स्थापन करावयाचे होते.

निजामाच्या मगरमिठीतून या संस्थानातील जनतेची सुटका करून हे संस्थान भारतीय संघराज्यात विलिन करण्यासाठी वेगवेगळ्या संघटनांनी पुढाकार घेतला होता. हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व देणारा, राष्ट्राला अखंडत्व आणि सार्वभौमत्व प्राप्त करून देणारा एकमेवाद्वितीय लढा होय. हा लढा हैद्राबाद संस्थांचे केवळ ४ सुभे आणि १६ जिल्ह्यांच्या भौगोलिक क्षेत्राचे भारतात विलीनीकरण करण्यासाठी आरंभिलेला नव्हता; तर भारताची अखंडता व एकात्मता अविभाज्य राहण्यासाठी उभारलेला

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-III, February 2012*

तो स्वातंत्र्यसंग्रामाच होता. हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम केव्हा व कोणत्या उद्देशपूर्तीसाठी सुरू झाला याविषयी इतिहास लेखकात मतभेद आहेत.

अनंत भालेरावांनी लिहिलेल्या 'हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा' या ग्रंथाला केशवराव कोठावळे पारितोषिक मिळाले. यानिमित्ताने आयोजित समारंभाच्या अध्यक्षपदावरून न्यायमूर्ती गोपाळराव एकबोटे म्हणाले, 'हैद्राबादचा लढा हा कुठून सुरू होतो याची माहिती मिळत नाही.'२

हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम वेगवेगळ्या टप्प्यामध्ये विभागला होता. या लढ्यामध्ये आर्यसमाज, हिंदूमहासभा, महाराष्ट्र परिषद, हैद्राबाद स्टेट काँग्रेस, हैद्राबाद स्टेट शेड्युलकास्ट फेडरेशन इ. संघटनांनी आपापल्या पद्धतीने हैद्राबाद संस्थानात सामाजिक व धार्मिक चळवळी करून निजामाच्या दडपशाही विरुद्ध आवाज उठवून जनतेमध्ये जागृती करण्याचे कार्य केले होते.

वरील सर्व संघटनांचे प्रत्यक्ष कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. गांधी यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान या स्वातंत्र्यसंग्रामात राहिले आहे. यामध्ये बाबासाहेबांच्या सहभागाविषयी अनेकांनी शंका-कुशंका उपस्थित करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न याद्वारे केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हैद्राबाद संस्थानात आगमन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात अशी टिका केली जाते की, ते निजामाचे हस्तक होते, हैद्राबाद मुक्ती संग्रामात त्यांचे योगदान पोलिस कारवाईपर्यंत काहीच नव्हते. परंतु टिकाकाराच्या अज्ञानाचा तो भाग असावा किंवा त्याने जाणिवपूर्वक टिका केली असावी. प्रत्यक्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हैद्राबाद संस्थानाशी संबंध आला तो डिसेंबर, १९३४ मध्ये. जेव्हा बाबासाहेब आपल्या सहकाऱ्यांसमवेत वेरुळची जगप्रसिद्ध लेणी पाहण्यासाठी गेले होते. तेथून त्यांनी जवळच असलेल्या देवगिरीचा अभेद्य किल्ला पाहण्याची इच्छा प्रकट केली. आपल्या सहकाऱ्यांसमवेत ते दौलताबाद येथे आले. किल्ल्याच्या प्रमुख प्रवेशद्वाराबाहेरच्या हौदात तोंड-हात धुतले. तेव्हा 'धेंडानी हौद बाटविला'

म्हणून मुसलमान पहारेकऱ्यांनी सर्वांना अश्लील शिविगाळ केली. त्यानंतर "आम्ही किल्ल्यात जाऊ शकतो की नाही ?" अशी विचारणा डॉ. आंबेडकरांनी केली असता, पहारेकऱ्याने अधिक्षकाशी बोलणी करुन सांगितले की, "तुम्ही आत किल्ल्यात जाऊ शकता, परंतु किल्ल्यामध्ये कोठेही पाणी असले तरी त्या पाण्यास तुम्हाला हात लावता येणार नाही."३

यावरुन असे स्पष्ट होते की, निजाम राजवटीत अस्पृश्यता किती टोकाला गेली होती. बाबासाहेबांना हैद्राबाद संस्थानात जेव्हा हा अनुभव आला यावरुन येथील दलितांची स्थिती काय असेल याची कल्पना त्यांना आली होती. तेव्हापासून निजामाच्या जुलमी व जातीयवादी राजवटीविषयी आंबेडकरांच्या मनात द्वेष होता व त्यांनी येथील जनतेला सतत प्रोत्साहन व पाठबळ दिले. ८-९ ऑगस्ट, १९३०ला डॉ.आंबेडकरांच्या पुढाकाराने अखिल भारतीय दलित वर्ग काँग्रेसचे पहिले अधिवेशन नागपूर येथे भरले. ह्या परिषदेत हैद्राबाद संस्थानात राबवण्यास सुरुवात केली.

संस्थानातील चळवळी संबंधी बााबासाहेबांनी नेहमीच कार्यकर्त्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिलेले होते. बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड, कोल्हापूर संस्थानाचे राजर्षि शाहू महाराज यांच्या कार्याची छाप बाबासाहेबांवर पडली होती. त्यांनी खऱ्या अर्थाने आपली संपूर्ण कारकिर्द संस्थानातील सामान्य गोरगरिब, दलित, पिढित लोकांच्या कल्याणासाठी घालविली होती. या व्यतिरिक्त जत, औंध, फलटण, भोर, इंदूर, ग्वाल्हेर इत्यादी संस्थानांच्या नरेशांबरोबर त्यांचे स्नेहसंबंध होते. त्यामुळे ह्या संस्थानांमध्ये दलितांना मोठ्या

www.ghrws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-III, February 2012*

प्रमाणात न्याय व सवलती मिळू लागल्या होत्या. झरी संस्थानिकांशी बाबासाहेबांचे मैत्रीचे संबंध असले तरी त्यांनी दलितांच्या हक्कांबाबत कुठेही तडजोड केली नाही. मैत्रीपेक्षा तत्वाचे महत्व त्यांनी अधिक अग्रक्रमाचे मानले होते.

१९३९ मध्ये संस्थानातील दलित प्रजा परिषदेच्या अध्यक्षस्थानावरुन भाषण करतांना त्यांनी अस्पृश्यांच्या हिताची वाढ होत नसलेल्या संस्थानाविषयी त्यांनी प्रखर टिका केली होती. याशिवाय १९३० ते ३२ च्या गोलमेज परिषदेमध्येसुद्धा त्यांनी संस्थानातील प्रजेची भूमिका अतिशय प्रभावीपणे मांडली होती. तसेच बाबासाहेबांनी संस्थानासंबंधी आपले मत मांडतांना 'राजाची सत्ता काढून घेऊन ती प्रजेच्या ताब्यात देण्याची सूचना केली होती.' सर्वसाधारण जनता ही सध्या लोकशाहीच्या तत्वावर सुधारणा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा वेळी 'संस्थानिकांनी आपला दृष्टिकोण बदलून प्रजेला जितके अधिक अधिकार देण्यासारखे असतील तेवढे दिले पाहिजेत' असे मत मांडले होते. ३० डिसेंबर, १९३८ मध्ये हैद्राबाद संस्थानातील औरंगाबाद जिल्हा दलित परिषद, मखनपूर (मक्कनपूर), ता.चाळीसगांव, जि.पूर्व खानदेश येथे आयोजित करण्यात आली होती. भिकाजी काशीराम थोरात हे या परिषदेचे संयोजक होते. एस.बी.जाधव स्वागताध्यक्ष होते. ही परिषद खुद्द निजाम राज्यातील औरंगाबाद येथे होऊ शकली नाही. कारण निजाम सरकारकडून परवानगी मिळाली नव्हती. डॉ. आंबेडकर या परिषदेचे अध्यक्ष होते. "आजची ही सभा निजाम स्टेट मधील औरंगाबाद जिल्ह्यातील दलितांची पहिलीच सभा आहे" असे या वेळी आंबेडकरांनी सांगितले होते. निजाम सरकारच्या राज्यात अस्पृश्यता पाळली जाते याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. ते म्हणाले "येथील राज्य करण्याची पध्दत सदोष आहे. म्हणून तुम्ही आतून काही करु शकत नाही, पण मी बाहेरुन जरुर करीन".५

बाबासाहेबांच्या हैद्राबाद संस्थानाच्या विलिनीकरणासंबंधीच्या कार्यामध्ये २३/०२/१९४१ च्या महार-मांग परिषद तडवले, जि. सोलापूरचा संदर्भ लागतो. या परिषदेत डॉ.आंबेडकरांनी सांगितले की, "हैद्राबादच्या नविन प्रस्तावित राज्यघटनेत अस्पृश्यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य ते प्रतिनिधित्व मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यात जरुर त्या प्रसंगी मी सहाय्य करु शकेन".६

डॉ.आंबेडकरांनी संस्थानातील जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरोधात तसेच अत्याचारा संबंधिच्या घटनेविषयी हैद्राबाद संस्थानच्या पंतप्रधानांना पत्रे पाठवून अन्याय दूर करण्याची विनंती करीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९४४ पर्यंत हैद्राबाद संस्थानात सामाजिक, धार्मिक व राजकीय चळवळीचे प्रत्यक्ष नेतृत्व करण्याच्या दृष्टीने आले नव्हते. परंतु त्यांचे विचार १९३१ पासूनच रावसाहेब बी.एस.व्यंकटराव व जे.एच.सुब्बय्या यांच्याद्वारे मराठवाड्यात पोहोचले होते.७

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा यांचा नेमका संबंध काय? असा कुत्सित प्रश्न नामांतरविरोधकांनी उपस्थित केला.

२) त्यांनी असा आरोप केला की, "पोलिस ॲक्शन होईपर्यंत बाबासाहेबांचा मराठवाड्याशी मुळीच संबंध नव्हता."

३) रझाकारांच्या अत्याचाराचा बाबासाहेबांनी निषेध केल्याचे जुन्या मंडळींकडून ऐकायला मिळाले नाही.

वरील सर्व आरोप हे बाबासाहेबांना बदनाम करण्यासाठी केले होते. परंतु बाबासाहेबांचे कार्य हे सर्वव्यापी असल्यामुळे तसेच यामध्ये कोणताही स्वार्थी हेतू नसल्यामुळे त्यांच्यावर आरोप करुन त्यांची लोकप्रियता कमी होणार नाही तर ती आणखी वाढतच गेली.

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानांच्या विलिनिकरणाचा मोठा प्रश्न भारत सरकार समोर होता. त्यावेळी संस्थानांच्या भारतातील विलिनीकरणाच्या कारवाईची सुत्रे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे होती.

www.ghrws.in

**ISSN 0976-9714**

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-III, February 2012*

डॉ. आंबेडकर हे तेव्हा कायदामंत्री होते. इतर संस्थानांपेक्षा हैद्राबाद संस्थानात संस्थानिकांकडून मोठ्या प्रमाणात अत्याचार होत होता. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस ही संघटना सातत्याने संस्थानिकाविरोधात लष्करी कारवाईची मागणी करीत होती. निजामाने आपले संस्थान भारत अथवा पाकिस्थानात विलिन न करण्याची भूमिका घेऊन आपले संस्थान स्वतंत्र असल्याची घोषणा केली होती.

तत्कालीन गृहमंत्री पटेलांनी संस्थानाच्या विलिनिकरणासंबंधी कायदामंत्री डॉ.आंबेडकर यांच्या बरोबर अनेकवेळा चर्चा केली होती. जुलै, १९४७ मध्ये जेव्हा भारत सरकारने हैद्राबाद संस्थानाचा प्रश्न लष्करी कारवाईने सोडविण्याचा निर्णय घेतला. ही कारवाई कशी करायची ह्यासंबंधी वल्लभभाई पटेल व डॉ.आंबेडकर ह्यांची चर्चा झाली.

भारत सरकारने ६ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाला हैद्राबाद संस्थानामधील हस्तक्षेपाचा इशारा दिला. १३ सप्टेंबरला मे.ज.चौधरी यांच्या कारवाईला सुरुवात झाली. या मोहिमेला 'आपरेशन पोलो' असे नाव देण्यात आले. अवघ्या ४ दिवसातच भारतीय लष्कराने हैद्राबादला ताबा मिळविला. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी ५ वाजता निजामाने मीर लायकअली मंत्रीमंडळाच्या राजीनाम्याची आणि युद्धबंदीची व रझाकार संघटनेवर बंदी घातल्याची घोषणा आकाशवाणीवरुन केली. अशाप्रकारे हैद्राबाद संस्थान भारतात विलिन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानाविरुद्ध करावयाच्या सैनिकी ऑपरेशनला 'पोलिस अॅक्शन' हा शब्द सुचविला. कारण ते सैनिकी ऑपरेशनच होते. परंतु त्याला सैनिकी कारवाई न म्हणता पोलिस कारवाई असे नाव दिले होते. अन्यथा कायदेशिर अडचण निर्माण झाली असती. तसेच भारतीय संसदेत हैद्राबाद विरोधी कृतीचे समर्थन करण्याची जबाबदारी विधिमंत्री डॉ.आंबेडकरांनीच पार पाडली. निजामाने आंतरराष्ट्रीय न्यायालयात व युनोमध्ये हैद्राबाद संस्थानाची बाजू मांडण्याची विनंती आंबेडकरांनी धूडकावून लावली यावरुन बाबासाहेब आणि हैद्राबाद संस्थानाचा संबंध व बाबासाहेबांची भूमिका यावर प्रकाश पडतो.

१४ ऑक्टोबर १९३५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा करतांना असे म्हटले होते की, 'मी हिंदू म्हणून जन्माला जरी आलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही' या त्यांच्या घोषणेनंतर वेगवेगळ्या जातीच्या नेत्यांनी आंबेडकरांना आपापल्या धर्मात येण्याचे निमंत्रण दिले होते. १९५६मध्ये नागपूर येथे बौद्ध धर्म दीक्षा ग्रहण केल्यानंतर पी.टी.आय. प्रतिनिधी एन.व्ही.दामले यांच्याशी बोलताना बाबासाहेब म्हणाले होते, "हैद्राबादच्या निजामाने कोट्यावधी रुपयांची लालूच दाखवून इस्लाम धर्म स्वीकारण्याची विनंती केली होती. ती ऑफर स्वीकारली असती आणि मुस्लिम धर्मांतर केले असते. परंतु मला माझे नाव देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून नोंदवायचे नव्हते. ते पी.टी.आय. प्रतिनिधीला पुढे असे म्हणतात, विविध धर्माच्या लोकांनी आमिष दाखविले होते. जर त्यांच्या धर्माचा स्वीकार केला असता तर मला खात्री होती की, कोट्यावधी रुपयांचा सडा पायाशी पडला असता, पण देश पाच वर्षात बरबाद झाला असता."८

बाबासाहेबांवर त्यावेळी असा आरोप केला होता की, निजामाने लाखो रुपये किंमतीची जमिन व १२ लक्ष रुपयांचे बीनव्याजी, बिनमुदतीचे कर्ज पीपल्स एज्युकेशन सोसायटीला दिले म्हणून त्यांनी औरंगाबादला मिलिंद कॉलेज काढले. भारत सरकारच्या एका केंद्रिय मंत्र्याला स्वतंत्र राहू इच्छिणारा निजाम एवढे आर्थिक सहाय्य का करतो याचे उत्तर कुणीतरी दिले पाहिजे अशी विचारणा विरोधकांनी केली होती. हे १२ लाख रुपये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निजामाने आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी लाच म्हणून दिले असा आरोप केला होता. पण भ्रम म्हणजे सत्य नव्हे. सत्य असे की, हे कर्ज शेड्यूल्ड कास्ट ट्रस्ट फंडातून दलितांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी हैद्राबाद राज्य सरकारने मंजूर केले. तशा आशयाचे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. त्यावर आमदारांनी चर्चा केली. १ डिसेंबर १९४८ पासून नागरी प्रशासक एम.के. वेलोडी यांचे अंतरिम मंत्रिमंडळ सत्तेवर आले होते.

**ISSN 0976-9714**

www.goldenresearchthoughts... www.gjrnws.in

*Variorum, Multi- Disciplinary e-Research Journal*
*Vol.-02, Issue-III, February 2012*

वेलोडी मंत्रिमंडळाने कर्ज मंजूरीला एकमुखाने मान्यता दिली. २३ मे १९५० ला हैद्राबाद सरकारचे अर्थमंत्री सी. व्ही. राव व डॉ. आंबेडकर अध्यक्ष पीपल्स एज्युकेशन सोसायटी यांच्यामध्ये लेखी करार झाला. व १२ लाख रुपयाचे बिनव्याजी कर्जमंजूर झाले. १९ जून १९५० पासून मिलिंद कॉलेज, औरंगाबाद येथे सुरु झाले. तत्पूर्वी नियोजित कॉलेज हैद्राबाद येथे काढावे असा प्रस्ताव मांडण्यात आला होता. तो आंबेडकरांनी साफ नाकारला होता.९

१७ सप्टेंबर १९४८ ला पोलिसकारवाई होऊन निजाम राजवट संपुष्टात आली होती. त्यामुळे वरील आरोप हे बाबासाहेबांना बदनाम करण्यासाठी केले होते असे स्पष्ट होते.

बाबासाहेबांनी कुणाच्याही अमिषाला व पैशाला बळी न पडता स्वत:च्या हिंमतीवर मिलिंद कॉलेज सुरू केला होते. अभिनेता दिलीपकुमार याने औरंगाबाद मुक्कामी कॉलेज सुरु केले होते. अभिनेता दिलीपकुमार याने औरंगाबाद मुक्कामी कॉलेजला त्याचे नाव देण्याच्या अटीवर आर्थिक मदत देण्याची ऑफर दिली होती. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी अत्यंत स्पष्ट शब्दात त्याला सुनावले होते की, तुझ्यासारखा नाच्याच्या मदतीवर मी कॉलेज चालविणार नाही.

सार्वभौमत्वासाठी कोणत्याही संस्थानिकाशी तडजोड केली नाही. उलट हैद्राबादचा इतिहास आणि भूगोल पाहता निजाम स्वतंत्र राहणे शक्यच नाही. भारतीय सार्वभौमत्वाला त्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो. हे डॉ. आंबेडकरांनी सरदार पटेलांना पटवून दिले होते.

वरील सर्व घडामोडींचा व संदर्भाचा बारकाईने अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, हैद्राबाद संस्थानाच्या विलिनीकरणामध्ये बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व सहभाग प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे होताच हे नाकारता येत नाही. म्हणजे बाबासाहेबांनी देशासाठी व आपल्या तत्वासाठी कोणतीही तडजोड केली नाही. आपल्या विरोधकांना ते पुरून उरले होते; परंतु त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर काही सनातन्यांनी नामांतराच्या चळवळीमध्ये उत्फुर्तपणे सहभागी झालेल्या लाखो दलितांची दिशाभूल करण्यासाठी बाबासाहेबांवर वेगवेगळे आरोप करून चळवळ उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु बाबासाहेबांच्या विचाराशी एकनिष्ठ असलेला समाज कधीही त्यांच्या विचारापासून परावृत्त होऊ शकत नाही . कारण बाबासाहेबांचे मोठे उपकार या देशावर व येथील जनतेवर आहेत.

## संदर्भ सूची

१. जनगणना अहवाल, १९६१
२. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दि. ६ मे १९८८, पृ. ५
३. कांबळे बी.सी., समग्र आंबेडकर चरित्र, खंड १०, पृ. ३०
४. नरेंद्र गायकवाड, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वतंत्र्यसंग्राम
५. जनता, दि. १४/१/१९३९
६. कित्ता, दि. ८/३/१९३९
७. गायकवाड नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम
८. दैनिक तरुणभारत, नागपूर दि. १६/१०/१९५६, पृ.४
९. नरवडे, एस.एस., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबाद संस्थान, पृ. ५८

**ISSN 0976-9714**